# आम्ही ॥ पार्लेकर ॥

वार्षिक विशेषांक १९९६ किंमत रू. १२/-



# रूट नं. ८३



संजय उपाध्ये

'काय ? आज एटीथ्रीनं' ? मित्रानं विचारलं
'गेली चार वर्षे जातोय' मी
'कधी दिसला नाहीस मला ?'
आता काय सांगू ? कपाळ ! ह्या अशा लोकांची गंमत वाटते. हाताच्या बोटावर मोजता येईल इतक्याच वेळा ८३ नं गेलेला हा माणूस वर मलाच विचारतोय
'कधी दिसला नाहीस मला ?'
'बस् असंच नाही दिसलो,' मी.
कोणती तरी बस आली.
रांग उगाचच पुढे सरकली.
'साब, गरीब को दस पैसा दो बाबा, भगवान तुम्हारा कल्याण करेगा' एक भिकारी.
मी सुटे पैसे काढण्यासाठी खिशात हात घातला. त्यातलं पाच पैशाचं नाणं काढून देणार तोपर्यंत भिकारी पुढे निघून गेला. ते पण बिझी असतात हल्ली.
'हे चांगल नाही हं' मित्र.
'काय ?'
'उगाच हूल मारायची'
'नाही रे मी खरंच', वाद घालण्यासाठी मी तोंड उघडलं तेवढ्यात मागून -
'ओ चष्मेवाले, आगे बढो'
ज्या आवेशानं त्याने 'आगे बढो' म्हटलं की रांगेतील उरलेले लोक 'हम तुम्हारे साथ है' असं ओरडतील अशी भीती वाटून मी पुढे सरकलो. तेवढ्यात बस आली.
(बे) शिस्तीनं माणसं बसमध्ये चढली. मित्र चढला. मी चढणार इतक्यात कंडक्टर
'बस् हो गया साब। दिखता नहीं क्या बस फुल हो गया वो । तुम पढा लिखा आदमी को भी साला बोलना पडता है।'
आता इथं माझ्या शिक्षणाचा प्रश्न आला कुठे ? म्हणून मी सुद्धा थोडी हुज्जत घातली.

'जो बस तुमको फुल लगता है वो हमको नहीं लगता।'
असे म्हणत मी शेवटच्या पायरीवर उभा राहिलो.
'ठीक है। बस हिलेगा नही। टिंग'
बापरे, हे तर कंडक्टरचे अंतिम अस्त्र फार लवकर बाहेर काढलं.
जिद्दीला पेटायचं मी ठरवतो तोच बसमधून पहिली सीट ओरडली,
'आता कशाला एका पायी पन्नासांचा खोळंबा करताय? कंडक्टर तुम्ही मारा घंटी.'
बसप्रवाशांना आपल्या बाजूला घेण्यात यशस्वी झालेल्या कंडक्टरने माझ्याकडे बघत एक BEST मुरका मारला आणि 'टिंगटिंग' मला सोडून बस निघून गेली.
ह्या सर्व घटनेत "काय ८३ नं?" म्हणणाऱ्या मित्राचं 'वो साथ में है' हे एक वाक्य मला आत जाण्यास पुरेसं होतं. पण त्याला कसं कळणार ? गेली चार वर्षं मी ८३ ने जातोय, तो नव्हे.
सांताक्रूझ डेपो ते बॅलार्ड पियर हा एक ते सव्वा तासाचा प्रवास मी चार वर्षे करतोय. परत येताना ट्रॅफिक जॅममुळे दोन तास.
एकंदर साडेतीन तास मी एका दिवसात या प्रवासात घालवतो, म्हणजे ४ वर्षात जवळजवळ पाच हजार तास. या सर्व तासांनी मला आनंदी बनवलं.
बस चालू असताना सगळ्यांच्या चेहऱ्याकडे बघायची माझी हॉबी आहे. इंग्रजीत याला face reading म्हणतात.
बसकट, उभट, ओबडधोबड,नैसर्गिक गोंडस, कृत्रिम गोंडस, बावळट, जादा शहाणे, शहाणे, काही वेडे; खूप प्रकार असतात ह्या चेहऱ्यांचे. त्यांचे संवाद म्हणजे एक गंमतच.
दोन बायका माझ्या पुढच्या सीटवर बसल्या होत्या. मला ऐकू आलेला त्याचा संवाद-

'अगं काल काय गंमत झाली माहित्येय ?'
'काय ?'
'काल मी रजेवर होते'
'मग?'
'दुपारी शेजारच्या बायका आम्ही गप्पा मारत बसलो होतो इतक्यात तांदूळवाला आला.'...
'कैसा दिया चावल ?' एकीन विचारलं.
'साडे पाच रूपया किलो, बहेनजी', तांदूळवाला.
'दिखाव', दुसरी.
तांदूळवाल्याने डब्यातले तांदूळ एका कापडावर पसरले. तांदूळ हातात घेत आमच्या इथल्या बापटबाईंनी विचारलं -
'चावलमें खडा क्यूँ है ?'
'नही बहेनजी। मै कहाँ चावलमें खडा हूँ. मैं तो बाहरही खडा हूँ।'
'खडा मतलब, दगड, दगड'
असं सांगून बसमधली ती बाई हसत सुटली. बसमधे बसून बिल्डिंगमधल्या बापटबाईंच्या हिंदीची चेष्टा करणारी ती बाई तिचा स्टॉप आल्यावर पाठीमागच्या दारानं उतरायला गेली. बसमधे गर्दी, स्टॉपवर गर्दी- कंडक्टर ओरडला,
'ओ बाईजी, पीछेसे काहे को उतर रही हो? आगेसे उतरो, सबके लिए तकलीफ'
त्या बापटबाईंच्या हिंदीत हिनं उत्तर दिलं-
'आगे गर्दी बघो ना कितना है, पाठूनच जल्दी उतरेगी मै,'
आता मी हसत सुटलो.
असे अनेक प्रसंग. सकाळी कामावर जाताना असा प्रसंग घडला, की सारा दिवस कसा आनंदात जातो.
काही वेळा ड्रायव्हर कंडक्टरचाच ३६ चा आकडा असतो. अशा वेळी ते दोघे एकमेकांच्या कशाचाही उद्धार करतात.
एक दिवस-

'मै डबलघंटी मारा था नं, काय को रूकाया तुम?' कंडक्टर.

'अबे प्यासेंजर को उतरने देने का की नही ? एक ध्यान रखो तुम सबकी जान मेरे हाथमें है। ज्यादा किटकिट मत करो सुबे सुबे मूड खराब करता है।' ड्रायव्हर.

'टिंग' बस थांबली, कंडक्टर खेकसला.

'तू तो घंटीका गुलाम है समझा नं। तुम मशीन संभालता है जो चूपचाप तू करता है वैसा चलता है, इधर ये पागल दुनिया संभलते क्य तकलीफ है, मुझे मालूम ' कंडक्टर.

कंडक्टर, ड्रायव्हर म्हणून काही बुद्धिमान त्यांना खालच्या थराचे समजतात. पण काही प्रसंगातून त्यांचीही बुद्धिमान मार्मिकता ध्यानी येते.

बस चालवताना ड्रायव्हरचं नि एका सरदारजी टॅक्सीवाल्याचं वाजलं. सिग्नलला टॅक्सी बाजूला लावत सरदारजी म्हणाला

'की रे क्यों दबाता है ?'

(हे दबाना म्हणजे नक्की काय ते दोन्हीपैकी एक वाहन चालवल्याशिवाय कळणार नाही.)

'अबे तुझे टॅक्सी चलाने को आता है क्या ?' ड्रायव्हर.

'नही आता होगा - तुझे क्या उसका XXXX ?'

'टॅक्सी चलाने को नहीं आता और खलिस्तान मांगता है।'

या ड्रायव्हरच्या प्रतिक्रियेवर बस हास्यरसात बुडून गेली. वाहन, प्रवास, ट्रॅफिक म्हटलं की (छोटासा) अपघात हवाच.

एका मोठ्या चौरस्त्याच्या सिग्नलवर एका लष्कराच्या ट्रकचा आमच्या बसला धक्का बसला. चूक आमच्या ड्रायव्हरची नव्हती, पण लष्कराचा ट्रक म्हणून ड्रायव्हर कंडक्टर दोघेही घाबरले. कंडक्टरने साऱ्यांना साक्षीदार म्हणून नाव-पत्ता देण्याविषयी विचारले. माझ्याजवळ आला. मी लगेच नाव व पत्ता दिला. एक दिवस BEST चा इन्स्पेक्टर घरी आला. बसचा नकाशा काढून मी कुठे बसलो होतो इ. विचारून निघून गेला.

काही दिवस लोटले.ही गोष्ट मी पूर्ण विसरून गेलो, आणि तो कंडक्टर परत भेटला.

बस मधून मी खाली उतरलो.

'तिकीट?' चेकरने विचारले.

मी तिकीट देणार इतक्यात,

तो T.C. माझ्या पाया पडला.

'अहो, हे काय करताय ?'

"साहेब तुम्ही साक्ष दिलीत, नि प्रमोशनला काही प्रॉब्लेम नाही आला".

मी निरखून पाहिलं.

तोच तो कंडक्टर, लष्करी अपघातवाला.

वाचक हो, तुम्हांलाही एटीव्हीनं यावंसं वाटत असेल नाही? या, पण एक कृपा करा. मी जर रांगेत उभा असेन तर मला विचारू नका,

"काय ? आज ८३ नं ?"


**TOTAL SOLUTION IN QUALITY COMPUTER TRAINING**

GOVT. RECOGNISED INSTITUTE

**Plus Point**
**COMPUTER CENTRE**

(Member of Prestigeous National Association of Computer Trainers)

***Out Centres at :***
*Parle : A/4, Syamkamal,*
*Opp. Rly Station, Vile Parle (East),*
*Mumbai - 400 057. Tel : 614 09 55*

*Borivli : 801 6937, 863 5659.*
*Kandivli : 807 8809,*

"आम्ही पार्लेकर"
वार्षिक अंकानिमित्त
- हार्दिक शुभेच्छा -

**उपगटनेत्या - सौ. मंगलाताई जोशी**
११, जोशीवाडी, मालवीय रस्ता, विलेपार्ले (पूर्व),
मुंबई - ४०० ०५७. दूरध्वनी : ६१४ १० ३०.

आम्ही पार्लेकरांचे वाचक हितचिंतक यांच्या सुख जीवनासाठी आपला परिसर स्वच्छ ठेवा. झाडांची निगा राखा. भाजी खरेदीचे वेळी पाकीट व दागिने याकडे लक्ष द्या. घरी काम करणाऱ्यांची माहिती ठेवा. वळणावर खुण दाखवूनच वहाने वळवा. रस्त्यांवरून चालताना कडेने चाला व मुलांना डाव्या बाजुला ठेवा. घरोघरी कचरा गोळा करण्यासाठी येणाऱ्या गाडीत कचरा टाका आणि परिसर स्वच्छ ठेवण्यास मदत करा. भटकी / रोगट कुत्र्यांबद्दल व इतर तक्रारीबद्दल ८३६७१०२ या क्रमांकावर तक्रार निवारण अधिकारी, के-पूर्व वॉर्ड यांना फोन करा.

*With Best Compliments From*

# The C.K.P. Co-op. Bank Ltd.

*Anand Laxmi, Near Ramdas Ashram,*
*Prarthana Samaj Road, Vile Parle (E),*
*Mumbai 400 057. Tel. : 619 1027 / 28*